पीएच.डी. संशोधन आराखडा

“अकोला जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार : एक भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक
महानंदा लिंगुराम दिंडे
ए.एम., बी.एड., एम.फिल

मार्गदर्शक
प्रोफेसर डॉ. हरिदास भोजुराम राठोड
प्राचार्य
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ)
ता.मुखेड जि.नांदेड

संशोधन केंद्र
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

मे २०१९

"अकोला जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार : एक भौगोलिक अभ्यास"

प्रस्तावना :

कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील लोकांच्या निकोप आरोग्यावर अवलंबून असते. व्यक्तीचे आरोग्य सुदृढ व निकोप असेल तर देशाची आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक प्रगती गतिमान अवस्थेत चालू असते. म्हणून प्रत्येक देशातील शासनसंस्था लोकांचे आरोग्य उंचावण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. भारताने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हणजेच १९४८ मध्ये 'कामगार राज्य विमा योजना' व १९५४ मध्ये केंद्र सरकारतर्फे 'आरोग्य योजना' सुरू करून जनसामान्यांना रोग उपचाराच्या बाबतीत दिलासा दिला. या पद्धतीमुळे आरोग्य आणि औषधोपचार या सेवा खाजगी क्षेत्राकडून सार्वजनिक क्षेत्राकडे आल्या.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात आरोग्यविषयक नियोजन आर्थिक आणि सामाजिक नियोजनाचाच एक अविभाज्य घटक बनले आहे. आरोग्यविषयक नियोजनाचा कार्यक्रम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्या पद्धतीने राबविण्यास सुरूवात झाली त्याचे मूळ १९४३ च्या भोर कमिटीने सूचविलेल्या सूचनांची अंमलबजावणी समजली जाते. या कमिटीने राष्ट्रीय पातळीवर सर्वेक्षण करून देशाचे आरोग्य सुधारण्यासाठी सुचना केलेल्या आहेत. यानंतर मुदलियार कमिटी, छाडा कमिटी, मुकर्जी कमिटी, कर्तारसिंग कमिटी व राष्ट्रीय आरोग्य धोरणाच्या माध्यमातून देशातील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी सूचना केलेल्या आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्ष झाली. तरीदेखील भारतातील गरिब जनता निरोगी आयुष्य जगण्यासाठी व आरोग्य सोयी-सुविधांसाठी झगडत आहे. वास्तविक पाहता शिक्षण हा जसा प्रत्येक नागरीकांचा घटनात्मक हक्क आहे तसाच आरोग्य हासुद्धा घटनात्मक हक्क आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये व्यक्तीच्या आरोग्यविषयक अधिकाराविषयी तरतुदी केलेल्या आहेत. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात नागरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे

आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे लोकांना खाजगी आरोग्य सेवेचा लाभ घेणे परवडत नाही. त्यामुळे ते आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. खाजगी आरोग्य क्षेत्र हे गरीब व दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना नेहमीच सशक्तपणे कमी दरात आरोग्य सेवा देवू शकत नाहीत. शासकीय आरोग्य सेवा मात्र तुलनेने अतिशय किफायतशीर दरामध्ये सर्वांना सेवा उपलब्ध करून देतात.

आरोग्यदायी समाज असेल तर देशाचा विकास होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येक देशातील शासनसंस्था जनतेचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. भारतामध्ये जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी जिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून मोफत व कमी दरात आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात आहेत. एखाद्या प्रदेशातील लोकसंख्येच्या वाढीबरोबरच मानवी आरोग्य केंद्रामध्येही वाढ होणे अत्यावश्यक असते. जिल्ह्यात एकाच विभागात आरोग्य केंद्राचे केंद्रीकरण झाल्यास दुसऱ्या विभागात आरोग्य केंद्राची कमतरता निर्माण होते व याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे शासकीय आरोग्य केंद्राच्या वितरणाचा भौगोलिक दृष्टीकोनातून विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. मानव ज्या भौगोलिक पर्यावरणात जीवन जगत असतो त्या पर्यावरणाचा मानवाच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे प्रदेशानुसार मानवाला वेगवेगळया प्रकारचे रोग होतात. याचेही भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

अभ्यास क्षेत्र व विषय निवड :

अकोला जिल्हा पूर्णा नदीच्या किनारी वसलेला असून महाराष्ट्राच्या उत्तरपूर्व भागात आहे. या जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र अकोला आहे. अकोला जिल्हा हा अमरावती प्रशासकीय विभागात येतो. अकोला जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार २०°१७। उत्तर ते २१°१६। उत्तर तर रेखांशीय विस्तार ७६°०७। पूर्व ते ७७°०४। पूर्व असून जिल्ह्याच्या पूर्वेस आणि उत्तरेस अमरावती जिल्हा, दक्षिणेस वाशिम जिल्हा तर पश्चिमेस बुलढाणा जिल्हा आहे. जिल्ह्यात पूर्णा ही मुख्य नदी असून कोरपूर्णा, मोरणा, मुन, मान, उमा, पूस ह्या उपनद्या आहेत.

जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५४२८.३४ चौ.कि.मी. आहे. तर सन १०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण लोकसंख्या १०९४१६५ आहे. आणि ग्रामीण लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी.ला २०१.५४ एवढी आहे.

संशोधनाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व संशोधकाने पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१) अकोला जिल्ह्यातील आरोग्य केंद्राची माहिती मिळवण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

२) अकोला जिल्ह्यात उद्‌भवणाऱ्या आजारांची माहिती मिळविण्यासाठी सदरील संशोधन महत्त्वाचे ठरते.

३) अकोला केंद्रातील सोयी-सुविधांचा आढावा घेवून त्यातील उणिवा दूर करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

४) शासकीय पातळीवर व सार्वजनिक अथवा खाजगी पातळीवर आरोग्यविषयक धोरण ठरविताना हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

५) आरोग्यविषयक लोकसंख्येच्या गरजा व उपलब्ध सेवा यांचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

६) अकोला जिल्ह्यातील आरोग्य केंद्राची व वैद्यकीय सुविधांची भिन्नता नाहीशी करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

७) आरोग्य अभ्यासक, लोकसंख्या अभ्यासक, वैद्यकीय अभ्यासक, सामाजिक संस्था व देणगीदार यांच्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

८) अकोला जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्य केंद्राचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरते.

९) अकोला जिल्ह्यातील विविध रोग, आरोग्य केंद्रे, आरोग्यविषयक शासकीय योजना, आरोग्यविषयक ध्येय धोरणे यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१) अकोला जिल्ह्यातील मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

२) आरोग्य केंद्राचे तालुकानिहाय वितरण अभ्यासणे.

३) आरोग्य केंद्रातील बदलांचा अभ्यास करणे.

४) आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या पदसंख्येचा अभ्यास करणे.

५) आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता व कमतरता यातील भिन्नता तपासणे.

६) आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासणे.

७) विविध आजारांचा अभ्यास करणे.

८) शासकीय आरोग्य सुविधांचा व योजनांचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये :

१) आरोग्य केंद्राची संख्या अपूरी आहे.

२) अकोला जिल्ह्यातील आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर पदांपेक्षा कमी आहे.

३) आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाली नसून अत्याधुनिक सोयी-सुविधाही उपलब्ध नाहीत.

४) आरोग्य केंद्राचे वितरण असमान आहे.

५) तालुक्यातील लोकसंख्या व आरोग्य केंद्राची संख्या यात सहसंबंध नाही.

आकडेवारी संकलन स्त्रोत

या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेतला जाणार असून प्राथमिक स्वरुपाची माहिती शासकीय जिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना भेटी देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त करण्यात येईल. दुय्यम स्वरूपाची माहिती व आकडेवारी जिल्हा परिषदेमधील आरोग्य विभागाचा वार्षिक अहवाल, जिल्हा रूग्णालयातील वार्षिक अहवाल, विविध वर्षाचे सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका इ.स.१९९१ व २००१, जिल्हा गॅझेटियर, वैद्यकीय भूगोलाचे विविध संदर्भ ग्रंथ, आरोग्याशी संबंधित मासिके, अनेक संशोधन लेख, आरोग्य सेवा संचालनालयाचा अहवाल व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात येणार आहे.

अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साह्याने केलेले आहे. हे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी पद्धती वापरलेली आहे. आरोग्य केंद्राचे वितरण दाखवण्यासाठी नकाशाशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केलेला आहे. कार्ल पिअरसन यांची सहसंबंध पद्धत प्रस्तुत संशोधनात वापरण्यात आली आहे. आरोग्य केंद्र व क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांचा सहसंबंध काढण्यात येईल. त्याकरिता खालील सुत्र वापरण्यात येणार आहे.

$$r = \frac{\Sigma dxdy}{\sqrt{(\Sigma dx)^2 \times (\Sigma dy)^2}}$$

अभ्यास क्षेत्रातील आरोग्य केंद्राचे वितरण कशा पद्धतीने झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर करण्यात येईल. यासाठी खालील सूत्र वापरण्यात येणार आहे.

$$RN = \frac{\text{Observed Mean Dis tan ce}}{\text{Expected Mean Dis tan ce}}$$

$$0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा :

RN = Randomties

A = Total Area

N = Total Number of Medical Centers

आरोग्य केंद्राचे क्षेत्रफळ, वसाहत संख्या व लोकसंख्येनुसार असलेले वितरण अभ्यासण्यासाठी $S.D. = \sqrt{\frac{\Sigma(x-\bar{x})^2}{N}}$

या सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी विविध चार पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल. त्यात जॅक्सन यांची सुधारीत पद्धत, व्ही.एल.एस. प्रकाश राव यांची

सुधारीत पद्धत, सक्सेना यांची सुधारीत पद्धत आणि अनुभवाधिष्ठित पद्धत यांचा वापर करण्यात येईल.

I) Jackson's Modified Method

1) $$\text{(Influence area according to area} = \frac{\text{Total Area}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

2) $$\text{(Influence area according to villages} = \frac{\text{Total Villages}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

3) $$\text{(Influence area according to population} = \frac{\text{Population}}{\text{Total No. of Medical Centre}}$$

II) V.L.S.Prakash Rao Method

$$D = \frac{T \times A}{U} \,/\, R = \frac{T \times A}{U}$$

Modified Method

$$SI = \frac{TC \times A}{U} \,/\, R = \frac{\sqrt{TC \times A}}{U}$$

III) सक्सेना यांचे प्रभावक्षेत्राचे सूत्र

त्रिज्या = (एकूण क्षेत्र) x (आरोग्य केंद्राची एकूण लोकसंख्या) / संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या

सुधारीत सुत्र त्रिज्या = √[(एकूण क्षेत्र) x (आरोग्य केंद्राची एकूण लोकसंख्या) / संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या]

सदरील संशोधनासाठी एकूण आरोग्य केंद्रांपैकी १० टक्के आरोग्य केंद्रांची नमुना म्हणून निवड करण्यात येईल.

अभ्यासाची मर्यादा

१) सदरील संशोधन करतांना शासकीय आरोग्य केंद्राव्यतिरिक्त इतर सार्वजनिक अथवा खाजगी आरोग्य केंद्राचा विचार केलेला नाही.

२) सदरील संशोधन करताना आजारांचा व त्यावरील उपचार पद्धतीचा अभ्यास केलेला आहे.

३) संबंधित संशोधन हे अकोला जिल्ह्यातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीला अनुसरून असल्याने या संशोधनाचा इतर जिल्ह्याशी अथवा राज्यांशी तुलना होऊ शकणार नाही व येथील निष्कर्ष हे इतर जिल्ह्यांना लागू होतीलच असे नाही.

४) प्राथमिक माहिती मिळविताना संशोधक यथाशक्तीवर मर्यादा ठेवण्याचा प्रयत्न करेल.

संदर्भ साहित्याचा आढावा :

देवेंद्रकुमार नायक यांनी “Spatial Patterns of Health Care in the Khasi Hills of Meghalaya” या विषयावर शोधनिबंध लिहिला. या शोधनिबंधात त्यांनी मेघालयातील खासी टेकड्यामधील आरोग्य सेवांचे विश्लेषण केलेले आहे. त्यामध्ये १९८१ ते २००१ पर्यंत त्या प्रदेशात झालेली आरोग्य केंद्रातील वाढ, आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या विविध सुविधा, आरोग्य केंद्र व गावातील अंतर, आरोग्य केंद्राचे स्थान व वितरण यांचे सविस्तर संशोधन केलेले आहे. **भूपेंद्र सिंग** यांनी “A Study of Spatial Variations of Medical Centers in Haryana, India” या शोधनिबंधात हरियाणा राज्यातील १९८१ ते २००१ या वीस वर्षातील आरोग्य केंद्रात झालेल्या बदलाचा अभ्यास केलेला आहे. तसेच लोकसंख्या व खाटांची संख्या याच्या गुणोत्तराचाही अभ्यास केलेला आहे.

माजीद हुसेन यांनी “Medical Geography” हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये वैद्यकीय भूगोलाचा विकास व व्याप्ती, आरोग्य व रोगाची संकल्पना, पर्यावरण व मानवी आरोग्य इ. चे विश्लेषण केलेले आहे. **अहमद हुसेन** यांनी 'Geography of Health' हा ग्रंथ लिहला या ग्रंथामध्ये त्यांनी आरोग्य भूगोलाचा विकास, मूलभुत आरोग्य सुविधा, विविध रोग, कुपोषण व प्राथमिक आरोग्य सेवांचा आढावा घेतलेला आहे.

मेलिंडा एस. मीडे व रॉबर्ट जे. इरीक्सन या दोघांनी मिळून “Medical Geography” हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी वैद्यकीय भूगोलाचा विकास, मानवाच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक, विविध रोगाची उत्पत्ती व प्रसार, आरोग्यविषयक सुविधांचा विकास इ. आढावा घेतला आहे. तसेच विविध खंडातील काही महत्त्वाच्या देशामध्ये

आरोग्यावर एकूण उत्पन्नाच्या किती टक्के खर्च केला जातो व एक डॉक्टर किती लोकसंख्येला सेवा पुरवितो याचाही आढावा घेतला आहे.

प्रा. विजय बैसाणे यांनी “औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य सेवा सुविधांचा भौगोलिक अभ्यास” या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केलेले आहे. या शोधप्रबंधात त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामीण रूग्णालयाच्या माध्यमातून शासनाकडून मिळणाऱ्या आरोग्य सेवा सुविधा व ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्यविषयक असलेल्या समस्यांचा अभ्यास केलेला आहे.

प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ वैद्यकीय भूगोलाचा अर्थ

१.३ वैद्यकीय भूगोलाच्या व्याख्या

१.४ वैद्यकीय भूगोलाचा विकास

१.५ आरोग्याची संकल्पना

१.६ आरोग्यावर परिणाम करणारे घटक

१.७ भारतीय वैद्यकशास्त्र

१.८ प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र

१.९ गृहितके

१.१० उद्दिष्ट्ये

१.११ आधार सामुग्रीचे संकलन

१.१२ अभ्यास पद्धती

१.१३ अभ्यासाच्या मर्यादा

१.१४ साहित्याचे पुनरावलोकन

१.१५ प्रकरण मांडणी

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी

२.३ स्थान व विस्तार

२.४ भूपृष्ठरचना

२.५ नदीप्रणाली

२.६ हवामान

२.७ मृदा

२.८ वनस्पती

२.९ लोकसंख्या

२.१० वसाहत

२.११ कृषी, पीके व पिकपद्धती

२.१२ जलसिंचन

२.१३ रस्ते वाहतूक

२.१४ उद्योगधंदे

प्रकरण तिसरे- आरोग्य केंद्राचे वितरण

३.१ प्रस्तावना

३.२ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या, प्राथमिक आरोग्य केंद्र,

३.३ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

३.४ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण रुग्णालय

३.५ शहरापासून विविध आरोग्य केंद्राचे निअरेस्ट नेबर रँडम स्केल

३.६ शासकीय धोरणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र

३.७ शासकीय धोरणानुसार प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

३.८ शासकीय धोरणानुसार ग्रामीण रुग्णालय

३.९ आरोग्य केंद्रापासून ग्रामीण वसाहतीचे अंतरानुसार तालुकानिहाय वितरण

प्रकरण चौथे - आरोग्य केंद्राची वाढ व विकास

१.१ प्रस्तावना

१.२ तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

१.३ तालुकानिहाय विविध प्रकारच्या सर्व आरोग्य केंद्राच्या लोकसंख्येतील वाढ,

१.४ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या लोकसंख्येतील वाढ,

१.५ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लोकसंख्येतील वाढ

१.६ तालुकानिहाय ग्रामीण रुग्णालयाच्या लोकसंख्येतील वाढ

१.७ तालुकानिहाय आरोग्य केंद्रात झालेली वाढ

१.८ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात, प्राथमिक आरोग्य केंद्रात व ग्रामीण रुग्णालयात झालेली वाढ

१.९ ग्रामीण रुग्णालय निहाय लोकसंख्येत वाढ

प्रकरण पाचवे - आरोग्य केंद्राचे प्रभावक्षेत्र

५.१ प्रस्तावना

५.२ आरोग्य केंद्राच्या विकासाचा स्तर

५.३ आरोग्य केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे सैद्धांतिक व अनुभवधिष्ठीत विश्लेषण

५.४ जॅक्सन, व्ही.एल.एस.प्रकाशराव व सक्सेना यांची पध्दत

५.५ प्रभावक्षेत्र

प्रकरण सहावे - आरोग्य केंद्रातील विविध सेवा पदांचा आढावा

६.१ प्रस्तावना

६.२ आरोग्य केंद्रातील पदांचा आकृतीबंध

६.३ आरोग्य केंद्रातील भरलेल्या कर्मचाऱ्यांची पदानुक्रमे सद्यस्थिती

६.४ तालुकानिहाय आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची सद्य:स्थिती

६.५ आरोग्य केंद्रातील एकूण मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा आढावा

प्रकरण सातवे - विविध प्रकारचे आजार व त्याची कारणे

७.१ प्रस्तावना

७.२ विविध रोगाची संकल्पना

७.३ अतिसार

७.४ अमांश

७.५ विषमज्वर

७.६ क्षयरोग

७.७ हिवताप

७.८ कावीळ

७.९ कुष्ठरोग

७.१० एड्स

प्रकरण आठवे - निष्कर्ष व शिफारशी

१.१ निष्कर्ष

१.२ शिफारशी

१.३ उपाययोजना

संदर्भ सूची

१) सिंघई जी.सी. (२००८) चिकित्सा भूगोल, वसुंधरा प्रकाशन, गोरखपूर

२) डॉ.जगन्नाथ वि. दिक्षीत (अनुवादक) (२००५) सामाजिक आरोग्य परिचर्या, बनारशीदास भनोत पब्लिशर्स, जबलपूर

३) अकोला जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन १९९१, २००१, २०११

४) अकोला जिल्हा परिषद, आरोग्य विभाग अहवाल

५) अकोला जिल्हा गॅझेटिअर

६) महाराष्ट्राचा भूगोल - ए.बी. सवदी

७) मराठी विश्वकोश खंड - प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

८) रोड ॲटलास - महाराष्ट्र, समर्थ उद्योग प्रकाशन, औरंगाबाद

9) Majid Husain (1974): Medical Geography Anmol Publications, New Delhi.

10) Geraid F.Pyle (1979): Applied Medical Geography-New York.

11) Akhtar Rais: Diseases Ecology and health.Rawat Publication–Jaipur.

12) Dr.Ahmed Hussain (2007) Geography and Health.Mahaveer Sons,New Delhi.

13) Agnihotri.R.C. (1995): Geomedical Environment and Health Care. Rawat Publication –Jaipur.

14) Primary Health Center(2006) :Manual, Directorate of Health Service, Maharashtra, Mumbai.

15) Statistical methods in geography-Rajasthan Hindi Grantha Academy.

16) Economic survey of Maharashtra 2006 to 2014.

Websites

1. www.Maharashtra state data bank Govt. of Maharashtra.
2. www.india.gov.in
3. http://mahades.maharashtra.gov.in
4. www.akola.ac.in
5. www.mahaarogya.com
6. www.jsk.gov.in

संशोधक

महानंद लिंगुराम दिंडे

ए.एम., बी.एड., एम.फिल

मार्गदर्शक

प्रोफेसर डॉ. हरिदास भोजुराम राठोड

प्राचार्य

ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ)

ता.मुखेड जि.नांदेड